# डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक लि.,अमरावती

## मुख्य कार्यालय, इर्विन चौक,अमरावती.

# वार्षिक साधारण सभेची सूचना

## सन २०२०-२०२१

बँकेच्या सर्व सन्माननीय भागधारक सभासदांना कळविण्यात येते की, कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या दि. २५.०२.२०२१ संदर्भ क्र. संकीर्ण -२०२०/प्र.क्र.२४/१३-स च्या परिपत्रकातील निर्देशानूसार बँकेची ४८ वी वार्षिक साधारण सभा बुधवार, दिनांक २९.०९.२०२१ रोजी, सकाळी १०:३० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्स **(Video Conferance)** / अदर ऑडीओ व्हिजुअल मीन्स **(Other Audio Visual Means)** व्दारे आयोजित केली आहे. आभासी पध्दतीचा अवलंब केला असल्याकारणाने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. त्यामुळे सदर सभा शिवाजीनगर शाखेचे सभागृह, पंचवटी चौक, मोर्शी रोड, अमरावती-४४४६०३ येथे आभासी पध्दतीने घेण्यात येत असल्याकारणाने सदर सभेस आपण ऑनलाईन उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेच्या उपस्थितीकरीता सदहु लिंक आमसभेपुर्वी पाठविण्यात येईल.

**सभेपुढील विषय :-**

१. ४८ व्या वार्षिक साधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थिती बाबतची नोंद घेवून ती क्षमापित करणे.
२. मागील दिनांक ३० मार्च २०२१ रोजीच्या वार्षिक साधारण सभेची कार्यवाही वाचून कायम करणे.
३. सन २०२०-२१ चा वार्षिक अहवाल, बँकेचे संचालक मंडळाने सादर केलेला २०२०-२१ चा लेखा परिक्षित ताळेबंद व नफातोटा पत्रक मंजूर करणे.
४. बँकेचे सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकातील ओलांडलेली तरतूद मंजूर करणे.
५. बँकेचे संचालक मंडळाने सादर केलेले सन २०२१-२२ चे अंदाज पत्रक मंजूर करणे.
६. बँकेचा सन २०२०-२१ चा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील बँकेने तयार केलेला दोष दुरुस्ती अहवाल मंजूर करण्याबाबत विचार करणे.
७. सन २०२२-२३ करीता बँकेसाठी समवर्ती व अंतर्गत लेखा परिक्षकांची नियुक्ती करणेबाबत. संचालक मंडळाची शिफारस विचारात घेणे.
८. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखा परिक्षणासाठी सनदी लेखापालाची नेमणूक करणे व त्यांचे पारिश्रमिक ठरविण्याबाबत विचार करणे.
९. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकाकडील कर्जाची नोंद घेणे.
१०. एकरकमी परतफेड प्रकरणांना संचालक मंडळाने केलेली शिफारस मंजूर करणे.
११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.

**अमरावती**
**दिनांक : १५ सप्टेंबर २०२१**

संचालक मंडळाचे आदेशवरुन
**किशोर शं. बुरघाटे**
कार्यकारी संचालक (प्र.)

**-: सूचना :-**

अ) वरील सभेसाठी आवश्यक गणपूर्ती (कोरम) अभावी सभा अर्ध्या तासासाठी तहकूब करण्यात येईल व तहकूब सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी सकाळी ११:०० वाजता वरील विषयांवर विचार करण्याकरिता घेण्यात येईल. अशा सभेस गणपूर्तीची गरज असणार नाही.

ब) सभासदांना काही सूचना, ठराव ईत्यादी सभेपुढे मांडावयाचे असल्यास अथवा बँकेच्या कामकाजा संबंधी प्रश्न विचारावयाचे असल्यास ते कृपया ई-मेल **pducbagm@gmail.com / Whats app / Telegram No. 9420337962, 9403327962** किंवा लेखी स्वरुपात दिनांक २२, सप्टेंबर, २०२१ रोजी सायंकाळी ०६.०० पावेतो मुख्य कार्यालयात पोहचतील याची काळजी घ्यावी. त्यानंतर आलेल्या किंवा वेळेवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे शक्य होणार नाही.

क) सभासदांनी पत्ता बदलला असल्यास तसेच अद्यावत पत्त्याबाबत माहिति बँकेस द्यावी.

ड) सभासदांनी वारस नेमला नसल्यास तो नेमण्याचे करावे.

इ) अहवालाच्या प्रती बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहेत.

फ) भागधारक सभासदांनी याच बँकेचे शाखेतील आपला खाते क्रमांक मुख्यालयाला कळवावा.

ग) खातेदारांनी संबंधीत शाखेला आपला भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नं.) द्यावा.

ह) टीडीएस कपात करणे आवश्यक असल्यामुळे पॅन क्रमांक व ईमेल (असल्यास) संबंधीत शाखेवर द्यावा.